# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नाशिक विभागीय मंडळ, नाशिक-४२२००३

परिपत्रक क्रमांक /नाविमं /उमाअ २/१२३४ दिनांक-०९-०९-२०२०

---

**संदर्भ-** १) शासन निर्णय क्रसंकीर्ण २०१९/प्र.क्र. (२४३/१९)/एसडी-४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०८ऑगस्ट२०१९९

२) परिपत्रक क्र.रा.मं. /पापुअ/पापुई/संशोधन /इ.११वीची विषय योजना वससुधारित मूल्यमापन योजना/४२४१, दि.१६/०८/२०१९.

३) शासन पत्र क्र.संकीर्ण ०८२०/प्र.क्र.११६/एसडी-२,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०२सप्टेबर२०२०

४) परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन /इ.१२वी मूल्यमापन आराखडा/ वेबसाईट/ ३७८९, दिनांक०४/०९/२०२०

**विषय-** इ.१२वीच्या **PCBM** गट ('भौतिकशास्त्र', 'रसायनशास्त्र', 'जीवशास्त्र' व 'गणित आणि संख्याशास्त्र') या विषयांचे सुधारित मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना इत्यादींबाबत.

या परिपत्रकान्वये नाशिक विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, इयता १२ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची व नवीन पाठयपुस्तकांची अंमलबजावणी शैक्षणीक वर्ष २०२० -२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता १२ वी च्या **PCBM** गट ('भौतिकशास्त्र', 'रसायनशास्त्र', 'जीवशास्त्र' व 'गणित आणि संख्याशास्त्र') या विषयांच्या मूल्यमापन योजनेची अंमलबजावणीही शैक्षणीक वर्ष २०२० -२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे शैक्षणीक वर्ष २०२० -२१ पासून इयत्ता १२ वीची सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आलेली आहे. मंडळाने विषयतज्ञांमार्फत शासन निर्णयातील निर्देशानुसार तयार केलेली तपशीलवार मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना यास संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजना व तदनुषंगीक बाबींना अनुसरून राज्य मंडळामार्फत विषयनिहाय ऑनलाईन व्दारे प्रशिक्षण नजिकच्या काळात आयोजीत करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात विषय शिक्षकांना विषयनिहाय मूल्यामापन आराखडे व अन्य तपशिल अवगत करून देण्यात येणार आहे. उपरोक्तप्रमाणे शासन मान्यताप्राप्त इ. १२ वीचे मूल्यामापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना या परिपत्रकासह मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील सर्व सूचना आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात. सदर वेबसाईटवरील परिपत्रकात दर्शविलेल्या मूल्यामापन आराखडयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२००१

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-
१ शिक्षण उपसंचालक नाशिक.
२ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.
३ जिल्हा परिषद नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.